

# मण्यांची टोपी

विनीता देशपांडे

# मण्यांची टोपी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : संकलकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल व ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा+, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मण्यांची टोपी

विनीता श्रीकांत देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# मण्यांची टोपी


## लेखिका : विनीता श्रीकांत देशपांडे

फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क संकलकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी संकलकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : १४ नोव्हेंबर २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



विनीता श्रीकांत देशपांडे

एम.ए.(मराठी), एम.ए(इंडॉलॉजी)

विनीताजींच्या प्रतिभेचा आवाका कथा, कविता, कादंबरी, समिक्षा लेखन, आकाशवाणी पुणेकेंद्रावरून काव्यवाचन, अनेक मासिक, दिवाळी अंक आणि वृत्तपत्रांसाठी लेखन असा व्यापक आहे. "स्मृत्पर्ण" या ई-साहित्य प्रकाशित पहिल्या कादंबरीवर वाचकवर्ग आपल्या प्रतिक्रिया पाठवत आहेत. ई- साहित्य प्रकाशित "मराठी कवितेच्या पाऊलखुणा" इ.स.हे सन १८०० ते सन१९०० याकाळातील कवि आणि त्यांच्या काव्यप्रवासाचा आढावा या लेखसंग्रहात घेतलेला आहे. ई साहित्यतर्फे त्यांच्या फ़ुल्लारी ,रंगीला रे आणि अभ्यंतर याही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यांच्या या चारही कादंबऱ्या वेगळया विषयांवरच्या आणि वेगवेगळया घाटाच्या आहेत. मण्यांची टोपी ही त्यांची दिर्घकथाही पुन्हा वेगळयाच विश्वातली आहे याचा अनुभव वाचकांना येईलच.

आगामी साहित्य- "भवताल" कथासंग्रह, "पारुषण" गुढकथासंग्रह, , आधुनिक मराठी कवितेच्या पाऊलखुणा(इ.स.१९००च्या पुढचा काव्यप्रवास). तसेच वाचकांच्या उदंड आग्रहावरून त्या स्मृत्पर्णचा उत्तरार्धही लिहीत आहेत.

विनीताजींचे कार्यक्षेत्र केवळ लेखनापुरते मर्यादित नसून त्या होप ऍन्ड हॅप्पीनेस फाँऊंडेशनची संस्थापक आहेत, तसेच अनेक सामाजिक उपक्रम ई-कचरा संकलन, गरजूंसाठी शालेय साहित्य संकलन, वृद्धाश्रमासाठी उपक्रम, विशेष मुलांसाठी उपक्रम, 10000books.in ची एन.जी.ओ.पार्टनर असा विविधांगांनी पसरलेला आहे. त्यांनी संपादित केलेले विरासत या नियतकालिकाचे अंक ई साहित्यच्या ई नियतकालिक विभागात वाचता येतील.

संपर्क- फ्लॅट नं.१२, इडन गार्डन, सेक्टर-२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४

मो.नं. ७०५७५७४२७२

मेल- vsdeshpande14@gmail.com




- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/paoolkhuna_vinitadeshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/smrutparn.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/fullari_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/rangeela_vinita_deshpande.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/abhyantar_vinita_deshpande.pdf

# अर्पण पत्रिका

**कालः पचति भूतानि कालः संहरते प्रजाः।**
**कालः सुप्तेषु जागर्ति कालो हि दुरतिक्रमः॥**
**(चाणक्य नीती)**

**मृत्युलोकात आत्मानुभूती घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला समर्पित**



# मण्यांची टोपी

# १

सुखदाचा फोन आला आणि रत्नाचा जीव कासावीस झाला.

"नीट जा, जपून जा, काळजी घ्या. पोहचल्यावर फोन करा, अंतराची काळजी घ्या......." रत्ना फोनवर वारंवार सांगत होती.

"आई पण न....खूप काळजी करते" सुखदा फोन बंद करत म्हणाली

"का ग काय झालं?" जयेश

"काही नाही रे! आपल्या या ट्रीपबद्दल परवा शाळेतून परस्पर जाऊन आईला सांगणार होते. पण तिच्याकडे जायला वेळच मिळाला नाही रे. आपण दिवेआगरला जातोय हे फोनवर सांगितलं तर इतक्या इंस्ट्रकशन्स् देत होती की काय सांगू." सुखदा

"सहाजिकच आहे" जयेश

"हो रे, एक तर तिची आणि अंतराची या आठवड्यात भेट झाली नाही म्हणून चिडली असेल बहुधा." सुखदा

"शक्य आहे." जयेश

"कित्ती सूचना.....मी लहान नाही ... चक्क आई आहे एका मुलीची." सुखदा चिडून म्हणाली

"आणि ती तुझी आई, म्हणून.....काळजी स्वाभाविक आहे ग" जयेश

"ती जरा जास्तच काळजी करते. इतर मैत्रींणींच्या आया बघते ना मी." सुखदा

"रिलॅक्स. चिडू नकोस." जयेश तिला समजवत म्हणाला

"अरे! असं तिचं वागणं मला नवीन नाही रे. लहानपणापासून बघत आले आहे मी." सुखदा

"अग, पजेसिव् आहे ती तुझ्या बाबतीत." जयेश

"ह्म्म. कधी कधी तिच्या काळजी करण्याचा अतिरेक होतो आणि त्यात माझा जीव गुदमरतो रे. हे तिला अजूनही कळत नाही." सुखदा उदास स्वरात म्हणाली

"टेक इट इझी. तिला तुझ्याशिवाय कोणी नाही." जयेश

"कित्येक असतात आपल्या आईवडिलांचे एकुलते एक. पण सगळे माझ्या आईसारखा काळजीचा अतिरेक करत नाहीत." सुखदा

"ओके. चेन्ज दॅट टॉपिक." जयेश

हे ऐकताच सुखदा बोलता बोलता थांबली.

"आकाश आणि अरुंधती आपल्या सोबत आले असते तर अजून मजा आली असती." थोड्यावेळाने सुखदा शांततेचा भंग करत म्हणाली

"हो ना. आकाशला वेळेवर महत्वाचं काम आलं ग. पोहचेल तो ही दोन दिवसात." जयेश

"किल्ली घेतली ना रे तिथल्या घराची." सुखदा

"हो ग. शेजारच्यांना फोन करुन कळवले असेल त्यानी." जयेश

"आता झोपल्यात बयाबाई ....... उठल्यावर सुरु होईल धिंगाणा." सुखदा अंतराच्या केसांवरुन हात फिरवत म्हणाली

"चांगलीच बंड झाली आहे." जयेश कौतुकानं म्हणाला

गप्पा आणि गाण्याच्या तालासुरात गाडी दिवेआगरच्या दिशेने संथपणे चालली होती. "मैं फिक्र को धुएं में उडाता चला गया...गाणं सुरु होतं. त्या ठेक्यावर जयेश शिट्टी वाजवत होता. अंतरा आईच्या मांडीवर झोपली होती. तर सुखदा आठवणीत हरवली होती. .

"काय झालं राणी...?" जयेशनं विचारलं

"काही नाही रे. आम्ही फार पूर्वी दिवेआगरला आलो होतो. पण काही आठवत नाहीया." सुखदा

"इतकुशी होतीस तेव्हा तू. काय आठवणार? डोन्ट स्ट्रेस योअरसेल्फ. रिलॅक्स. जस्ट एन्जॉय अवर वेकेशन." जयेश

"ताम्हणी घाटात थांबू नकोस रे." सुखदाला एकदम आईच्या इंस्ट्रक्शनस् आठवल्यात.

"ओके डियर." म्हणत जयेशने गाडीचा वेग वाढवला.

खिडकीबाहेरच्या हिरव्या निसर्गात सुखदा स्मृतीपलीकडच्या खूणा शोधत होती. खरंच, काहीच कसं आठवत नाही....तिला आश्चर्य वाटत होतं.

ती दिवेआगरला आली होती तेव्हा चार-साडेचार वर्षाची असेल. काही गोष्टी अंधुकशा आठवत होत्या, नेमकी दिवेआगरच्या आठवणी आज तिला हूल देत होत्या. अंतराच्या चुळबुळीमुळे सुखदा भानावर आली. दोन तीन बिस्किट खाऊन झाल्यावर अंतराची पुन्हा मस्ती सुरु झाली. माणगाव क्रॉस करेपर्यंत अंतरा कंटाळली होती.

तिला हसवत खेळवत दोघेही दिवेआगरला तिन्हीसांजेच्या आधीच पोहचले. आकाश पाटिलचं घर शोधायला थोडा वेळ लागला, विचारपूस करता करता थोड्या वेळात सापडलं.

खिशातून किल्ली काढत जयेशने सुखदाला इशारा केला. दोघांनाही सुट्टी साठी हवी तशी जागा होती ती. बांबूनी वेढलेला संपूर्ण परिसर, भवताल नारळ, सुपारीच्या झाडांची गर्दी आणि मध्यभागी टुमदार छोटंस कौलारु घर.

शेजारच्यांनी अंगणात सडा टाकला असावा, त्याचा ओलसर गंध श्वासात खोलवर घेत जयेशने गाडीतून सामान काढायला सुरवात केली. सामान उतरवून होत नाही तर नुकत्याच घेतलेल्या कॅमेराने फोटो काढण्याचा मोह त्याला आवरला नाही. त्याने सुखदा आणि अंतराचे खूप फोटो काढले.

"अरे! बस रे आता. अजून बरेच दिवस आहोत आपण इथे." सुखदा पायरीवर बसत म्हणाली

"चल, काही तरी पोटात ढकलायला दे." जयेश सोबत आणलेल्या पिशवीत खायचं शोधू लागला

"चिवड्याचे दोन तीन बक्के मार." सुखदा चिवड्याचा डबा त्याच्या हातात देत म्हणाली

"छान झालाय चिवडा...खमंग अगदी तुझ्यासारखा..." जयेश

"मी आईंना फोन करते....तुझ्या आणि माझ्या आईला रे.." सुखदा

"चल, मी अंतराला तयार करतो. मळली आहे माझी बाहुली खूप." जयेश एका हाताने अंतराला कडेवर घेत दुसऱ्या हातात पिशवी घेत म्हणाला

अंतराला तयार करुन जयेश आणि सुखदा फ्रेश झाले. एका खोलीत सामान लावून दोघं किचनकडे वळलेत. तसं घरात गरजेचे सर्वच सामान होतं. जुजबी किराणा त्यांनी सोबत आणला होता. दुध व पिण्याच्या पाण्याची तेवढी सोय करायची होती.

आकाश आणि अरुंधती दर तीन चार महिन्यातून एखादी चक्कर टाकायचे. त्यामुळे घर व्यवस्थित होतं. ऐन वेळेवर सुट्टी कॅन्सल झाल्यामुळे तो जयेश सोबत न येता दहा दिवसांनी येणार होता. तसा शेजारच्या नारु अण्णा आणि निर्मलाकाकूंना आकाशने फोन करुन जयेश व सुखदा येणार असल्याचं कळवलं होतं.

जयेशची गाडी अंगणात बघून नारुअण्णा तिथे हजर झाले.

"आहात का घरात?" नारु अण्णा

अण्णांचा आवाज ऐकून तिघं बाहेर आलेत

"या ना काका." सुखदा

"काय कसा झाला प्रवास? तुम्ही जयेश ना? आकाशचा फोन आला होता." नारूअण्णां पायरीवर बसत म्हणाले

"हो. मी जयेश. या काका, आत या ना. प्रवास मस्त झाला." जयेश

"इथेच बसतो. अण्णा, नारु अण्णा म्हणतात मला सगळे" अण्णा घुडगे चोळत म्हणाले

"ओके. अण्णा" जयेश नमस्कार करत म्हणाला

"ते पलीकडे कुंपण आहे ना, त्याच्या मागे रहातो हो." नारु अण्णा

"अरे व्वा! आकाश सांगत होता. तुम्हीच या घराकडे लक्ष देता." जयेश

"शेजारधर्म हो. पूर्वी आमच्या घराचा प्रवेश इथूनच होता. परंतु हे टूरिझम वाढलं. तो, पलीकडचा रस्ता बीचकडे जातो. मग काय? इकडे कुंपण वाढवलं आणि गेट त्या बाजूने केले. घरासमोर फाटकापाशीच दुकान आहे. आम्ही आपलं रोजचं सामान विकतो. डेली नीड्स हो." नारु अण्णांनी एका दमात सांगितलं

"हो का? छान." जयेश

"अरे, पिल्लू का? गोड आहे हो. काय नाव हो?" नारु अण्णानी अंतराकडे बघत विचारलं

"नाव सांग. अंतरा!" सुखदा तिला सांगत होती.

अंतरा बिचकून आईच्या मागे लपली.

"अंतरा!....आबा आहेत...." सुखदा अंतराला समोर ओढत म्हणाली

"रुळेल थोड्यावेळात ती. नवीन आहे ना तिला हे सगळं." जयेश

"अण्णा, जवळपास दुकान आहे का? थोडं सामान आणायचं आहे." सुखदा

"इथे जवळच किराणा दुकान आहे. दूध, ब्रेड अंडी तर आपल्याच दुकानात मिळेल. त्या तिथे जाधवांकडे मिरगुंड छान मिळतील......सोलकढी प्यायची असेल तर जोशी मावशीच्या हातचीच हो..... आपल्या इथे वस्ती जरा विरळ आहे. घरं जरा दूर दूर आहेत. पण थोडं डावीकडे गेलात तर लागून घरं आहेत. "बीचकडे" पाटी लिहिली आहे ना...त्याच्या विरुद्ध दिशेला गेलात तर तोच रस्ता पुढे गणपती मंदिराकडे जातो.........." नारु अण्णा

"अण्णा, मी जरा फोन करुन आलोच. दोन मिनिट हं." अण्णांच बोलणं थांबत नाही बघून थोड्यावेळाने जयेश फोन करायच्या निमित्ताने बाजूला झाला तेव्हा कुठे त्यांच्या बोलण्याला ब्रेक लागला.

तेवढ्यात अंतराचं रडणं सुरु झालं आणि सुखदा तिथून बाजूला झाली. नारु अण्णा मात्र जयेशचं फोनवर बोलणं आटोपेपर्यंत पायरीवर बसून होते. अंधुक अंधार हळुहळु गडद होत होता.

"चला, दुध अंडी वैगरे तुम्हाला काय हवंय ते घेऊन येऊ. हो म्हणजे दुकान दाखवून देतो. नंतर त्रास नको हो." जयेशने फोन ठेवताच त्यांनी फर्मान सोडलं

"हो, चला ना. सुखदा....आलोच ग दहा मिनटात" जयेश चप्पल अडकवत म्हणाला.

अण्णा काही सामान आणल्याशिवाय जायचे नाही हे त्याच्या लक्षात आलं होतं. सुखदाने घराचा ताबा घेतला. किचन तसं स्वच्छ होतं, ओटा धुवून अंतरासाठी आणलेले अन्न गरम करुन तिला जेवायला घातलं. अंतरा शांत झाली.

"उद्या कमल नावाची पोरगी साफसफाईसाठी येईल गं." जयेशने सामान ओट्यावर ठेवत सांगितलं.

"अरे व्वा. तसं सगळं स्वच्छ आहे. बाई आली तर बरं होईल. जरा मदत होईल. या बाईसाहेब सुचू देतील तर ना." सुखदा अंतराकडे कौतुकाने बघत म्हणाली

रात्री ब्रेड ऑमलेट खाऊन थकलेले तिघेजण झोपी गेले. सकाळी कमलच्या दरवाजा ठोठवण्याने त्यांना जाग आली. कमल, तिशीतली सडसडीत बांध्याची सावळीशी बाई, सोबत तिची छोटीशी जेमतेम अंतराच्या वयाची मुलगी आली होती.

"ये. चहा ठेव आधी. मग सांगते काय काय करायचं आहे ते. ही तुझी मुलगी का? गोड आहे." सुखदा

"काय नाव तुझं?" जयेशने त्या मुलीच्या हातात बिस्किट देत विचारलं

"कुमुद" बोबड्या बोलीत ती लहान मुलगी म्हणाली

"ये, आमच्या अंतराशी खेळायला." सुखदाने तिला आणि अंतराला बसवून काही खेळणी दिलीत

कमलने न बोलताच भरभर अंगण आवरलं, पाण्याची काम आटोपली. ओसरीवर बसून अंतराला खेळवायचा तिचा प्रयत्न फसला. अंतरा तिच्याजवळ जायला तयार होईना. शेवटी कमलला स्वयंपाकघरातील काम सांगून सुखदा कुमुद आणि अंतराला अंगणात खेळवत बसली. जयेश जॉगिंग करुन आला. सुखदाला हायस वाटलं.

"घे रे हिला, काहीच करु देत नाही. कित्ती खेळायचं हिच्याशी...." सुखदा वैतागून अंतरा त्याच्या कडेवर देत म्हणाली

"चल चिमणे, आपण भुर्रर जाऊ..... चल कुमुद तू पण चल... .." म्हणत जयेश, अंतरा आणि कुमुद निघाले

"थांब रे. अग कमल कुमुदला जाऊ देत का ग सोबत?" सुखदा

"हो." पदराला हात पुसत कमल म्हणाली

"लांब नको जाऊ फार." सुखदा

"इथेच जवळच घेऊन फिरतोय मी...." जयेश

कमल, इथलीच का ग? सुखदाने बोलायचा प्रयत्न केला ....ती फक्त विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देत होती. बहुतेक तिला बोलायला आवडत नसावं. तिला कामं सांगून सुखदाने आईला फोन केला. घर कसं आहे? जागा कशी....आईची प्रश्नावली सुरु झाली. एकटी दुकटी खूप इकडे तिकडे, दूरवर जाऊ नको. आईने तिला हे किमान दहा वेळा सांगितले असेल.

"अगं वरच्या कामाला बाई आली आहे आत्ताच." सुखदाने आईच्या बोलण्याला ब्रेक लागावा म्हणून सांगितलं

"ओळखीची ना पाळखीची...असं कसं ठेवून घेतलं ग?" आईने काळजीनं विचारलं

"अग! ऐक तर, नारु अण्णा आणि निर्मला काकूंनी पाठवल आहे. त्यांच्या ओळखीची आहे." सुखदा

"हो का? बर मग ठीक आहे." आई

आई एवढी का काळजी करतेय? सुखदाला कळेना

"आई, मी लहान असतांना आपण एकदा दिवेआगरला चिन्मय मामासोबत आलो होतो न. काही आठवत नाही ग मला" हे वाक्य ऐकताच रत्नाने रात्री पुन्हा फोन करते म्हणत फोन ठेवला.

आईचं उत्तर टाळणं, पुण्याहून निघाल्यापासून तिच्या सतत सूचना देणं, तिला आश्चर्य वाटत होतं. आई असं का बोलत असेल या विचारात सुखदा ओसरीवर येऊन बसली. बावीस-तेवीस वर्षांपूर्वी ती इथे चिन्मयमामासोबत एका लग्नाला आली होती. नको असं काही तरी तेव्हा घडलं होतं. तिला फक्त एवढच आठवत होतं. नंतर या विषयावर आई व बाबा चर्चा करण्याचे टाळत होते. नंतर बाबांच्या अचानक जाण्याने हा विषय फारसा बोलला गेला नाही. काहीतरी नक्की घडलं होतं. मात्र काय? ते तिला त्या क्षणी आठवत नव्हतं. नेमकी हीच गोष्ट तिला अस्वस्थ करत होती. काही बाबतीत आई खूप पझेसीव होती तिला जणवत होतं. शाळेच्या, कॉलेजच्या पिकनीकला तिला आईनी कधीच पाठवलं नाही. आई तिला सहजासहजी एकटं राहू देत नसे. आज ती या सगळया गोष्टींचा का विचार करत होती हे तिला त्या क्षणी कळत नव्हतं. आईच्या अशा वागण्याचा आत्ता तिला अर्थ का शोधायचा हे ही तिला उमगत नव्हतं.

कमलच्या समोर येण्याने ती भानावर आली. ती खूणेने अजून काही काम आहे का विचारत होती.  तेवढ्यात "मम्मा....मम्मा.." रंगबेरंगी फिरती चक्री घेऊन अंतरा तिच्याकडे झेपावली

"काय उरकलेत न कामं." जयेशने ओसरीवर शेजारी बसत विचारलं

"मग, फिश फ्राय तय्यार आहे." सुखदा अंतराला मांडीवर घेत म्हणाली

"सोबत सोलकढी पण हं. ते ही जोशी मावशींच्या हातची." जयेश सुखदाच्या हातात पिशवी देत म्हणाला

जेवणं झाली तशी कमल आवरुन निघाली. निघतांना तिने आणि कुमुदने अंतराला हात दाखवला तशी अंतराने बाबांच्या मागे लपत हळूच टाटा केला.

"ओळख वाढली की गट्टी जमेल तिची तुझ्याशी" सुखदा अंतराला कडेवर घेत म्हणाली

"आज नको हरिहरेश्वरला जायला. उद्या जाऊ या का? सकाळी लवकर आवरते मी." सुखदा

"ओके, एज्ज यू से मॅम" जयेश

"एनी वे आकाशशी बोललो आज. अरुंधती आणि पुढच्या आठवड्यात येतील. तो आला की पार्टी मग दोन दिवस राहून आपण निघू. चालेल?" जयेश

"यप्प! मला काय शाळेला सुट्ट्या आहेत तोवर मला पण सुट्ट्या. तुझंच बघ रे" सुखदा जयेशला चिडवत म्हणाली

"या पूर्वी निघायच्या ऐन वेळेवर दोनदा तुझ्या सुट्ट्या कॅन्सल झाल्यात म्हंटलं" सुखदा

"सोड न यार." जयेश खजिल होत म्हणाला

"या वेळेस म्हणून तर जास्त सुट्ट्या घेतल्या.....सगळयाची भरपाई...." जयेश लाडात आलेला बघून तिने जेवायला चलायचा आग्रह धरला.

जेवण झालं. ओटा आवरता आवरता सुखदा परत जुन्या आठवणीत हरवली. त्या वेळेस नक्की काय झालं असेल? मला आठवत का नाही. आईला विचारावं तर चिडेल ती. तेच ते विचार तिला अस्वस्थ करत होते.

"काय ग राणी, मी तर इथेच आहे, तू कुठे हरवलीस." तिला विचारात मग्न बघून जयेशने थट्टेनं विचारलं

तरीही तिचा चेहरा गंभीरच. काही केल्या तिच्या डोक्यातून तो विचार जात नव्हता. जयेशने तिला जवळ घेताच तिला रडू आवरलं नाही. त्याने तिला समजवायचा खूप प्रयत्न केला.

"तुझ्या मनाचा खेळ आहे हा राणी. नको इतका विचार करु." जयेश

"इथे आल्यापासूनच ते विचारचक्र सुरु झालय रे." सुखदा

"काही नाही. इथे आल्यापासून तुला वेळ मिळाला. घर, तुझी शाळा, अंतरा यात तुला विचार करायला कुठे वेळ होता." जयेश

"मी इथे आधी येऊन गेले ....पण काहीच कसं आठवत नाही रे...आई पण नीट सांगत नाहीया." सुखदा

"परत तेच. एवढ्या लहानपणाचं मला तरी कुठे आठवतय ग" जयेश

मात्र  त्याचे सगळे प्रयत्न फोल ठरलेत. जयेश जेवढं तिला समजवत होता, ती तिच्या मतावर ठाम होत होती. शेवटी त्याने आईला फोनवर विचारु का म्हणताच ती चिडली जोरात आणि नाही..... म्हणून ओरडली.

"जयेश, अंधुकस आठवतय......मला एकदा ताप आला होता.... शेजारीच आई आणि चिनूमामा बोलत होते. आई त्याला शपथ घ्यायला सांगत होती...तो कधीच काही सांगणार नाही म्हणून. मी गुंगीत असल्यामुळे कशाबद्दल बोलत होती दोघं, मला उमगलं नव्हतं." सुखदा

हे सगळं ऐकल्यावर मात्र जयेशचा बांध सुटला.

"पुरे कर हे मनाचे खेळ. आणि समजा यात काही तथ्य असलं, तरी काही कारण असेल म्हणूनच आईने सांगितलं नसेल." जयेश चिडून म्हणाला

त्याला चिडलेला बघून सुखदा तेवढ्यापुरती शांत झाली. तिच्या डोक्यातून तो विचार बाजूला झालेला नाही हे जयेशच्या लक्षात आलं होतं. आईशी बोलण्यापेक्षा सध्या तिला या विचारांपासून डायवर्ट करणं गरजेच होतं. त्याने कॅमेरातले फोटो दाखवले. इकडच्या तिकडच्या गप्पांमध्ये तिला गुंगवण्याचा प्रयत्न सुरु होता. गाणी ऐकता ऐकता तिघं झोपी गेले.

दुपारची झोप झाली. तसे तिघं फ्रेश झालेत. सुखदा बऱ्यापैकी नॉर्मल झाली होती.

"ऐक ना, आपण आज बीचवर फिरुन येऊ. मावळतीचा सूर्य बघायचा आहे मला." जयेश चहाचं आधण ठेवत म्हणाला

"व्वा, जाऊ या ना." सुखदा

तेवढ्यात कमल आली. तिच्या हातात चहाचा कप देत सुखदाने तिला रात्रीचा स्वयंपाक करायला सांगितला. अंतराचा वरणभात खाणं झालं. सगळे कामं उरकलीत. कुमुद आणि अंतराला अंगणात खेळतांन बघून सुखदाला एक क्षण तिचं बालपण आठवलं. असच अंगण होतं, आसपास गर्दी होती....मी कोणाच्या मागे धावत होते? कोणाशी खेळत होती? काही केल्या तिला आठवेना. असो. दुपारी जयेशशी या विषयावर वादावादी झाली होती. आता परत नको म्हणून तिने तो विचार बाजूला करायचा प्रयत्न केला. तेवढ्यात कमलने तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि निघायचा इशारा केला.

"थांब कमल. आपण एकदमच निघू सगळे. अंतरा आणि कुमुदला आईसक्रीम घेऊन द्यायच आहे." सुखदा तिला खुणेने थांबवत म्हणाली

आईसक्रीमचं नाव ऐकताच दोघी उड्या मारायला लागल्या.

समोर हातात हात घालून चालणाऱ्या अंतरा आणि कुमुद, मागे मागे जयेश, सुखदा आणि कमल. उजवीकडे एक पायवाट येताच जयेश तिकडे वळणार तेवढ्यात कमलने खुणेनं तिकडून जाऊ नका म्हणून सांगितलं. तिचा विनवणारा चेहरा बघून ते तिघं मुख्यरस्त्यावरुन चालू लागले. आइसक्रीम खाऊन झाल्यावर कमल कुमुदला घेऊन निघाली तेव्हा तिने तिकडून न जाण्याबद्दल सांगितलं. सुखदाने तिला "त्या वाटेने नाही जाणार" याचं आश्वासन दिल्यावर कुमुदला घेऊन मधल्या आडवाटेने ती तिच्या घराकडे निघाली.

संध्याकाळचा मंदप्रकाश आणि बीचवरील कुंद हवा अलगद अंगाला बिलगत होती. अंतरा दमून जयेशच्या कडेवर झोपली होती. दोघेही निशब्द होते.  कुठल्या आठवणी त्रास देत आहे आपल्याला. धड आठवत पण नाही. जाऊ दे, झाला प्रकार विसरुन जायचा. आपण सुट्टी घालवायला आलो आणि काय वेडेपणा करतोय हा विचार सुखदाच्या मनात आला. खरच हा माझ्या मनाचा खेळही असू शकतो. बाबांच छत्र हरवलं आणि आई आपल्या बाबतीत पजेसीव झाली असावी. मी कुठे आईला सगळं सांगत होती. न सांगण्यासारखं असावं म्हणूनच नसेल सांगितलं. ती स्वत:ला समजवत होती. तिची घालमेल जयेशला लक्षात आली.

"सॉरी, मी मघाशी ओरडून बोललो" जयेश

"मीच सॉरी, नको त्या गोष्टीचा उगाच हट्ट धरुन बसले" सुखदा

फिरत फिरत दोघेही रुपनारायणाच्या मंदिरात आले. दर्शन घेऊन मंदिराच्या पायरीवर बसले. दोघांच्या मनातील मळभ सरलं होतं. तिन्ही सांज झाली होती. तिघांना परत येतांना बघून नारु अण्णांनी चहासाठी आवाज दिला.

"अग, आत ये ग." काकू

"ही अंतरा अंगणातच खेळतेय. असू द्या. इथेच पायरीवर बसून घेते मी चहा." सुखदा

"या ना तुम्ही पण घ्या चहा." जयेश

"नको. मी घेतला मघा." म्हणत काकू लगबग आत गेल्यात

चहा सोबत गप्पा झाल्यात. नारु अण्णा बोलत असले की आपण फक्त ऐकायचे, एव्हाना जयेशला हे लक्षात आले होते.

"काकू, थोड्या वेंधळया आहेत ना रे." सुखदा परततांना म्हणाली

"नारु अण्णा बोलूच नसतील देत त्यांना. किती बोलतो हा माणूस. मी नुसता मान डोलवत होतो." जयेश हसत म्हणाला

"हो. ना. असतो एकेकाचा स्वभाव. " सुखदा

"उद्या हरिहरेश्वर नक्की न. आवारायला घेते." सुखदाने असा वेडेपणा पुन्हा करायचा नाही हे मनोमन ठरवलं आणि तयारीला लागली.

सकाळी कमल आली आणि भराभर कामाला लागली. चूलीवर आंघोळीच पाणी तापायला ठेवून तिने भाजी चिरायला घेतली.

अंतरा आणि कुमुदची छान गट्टी जमली होती.

नाश्ता झाला. अंतराचं सामान चेक करत सुखदाने कमलला सुचना दिल्यात. "संध्याकाळी नको येऊस. उद्याच ये. हरिहरेश्वरहून यायला उशिर होईल."

"चला बसा गाडीत" जयेश सामान डिक्कीत ठेवत म्हणाला

"कुलूप लावलय, दिवे बंद आहेत, खिडक्या बंद. यप्प, चल निघू या" सुखदा

नारु अण्णांनी हात दाखवला तसं जयेशनी गाडी थांबवली, काच खाली केली.

"भाऊ सिरियस आहे. चार दिवस गावी जाऊन येतो. तुम्ही कुठे निघालात?" नारु अण्णा

"हरिहरेश्वर" सुखदा

"चला, तुम्हाला बस स्टॉप वर सोडतो" जयेश

"निर्मल, निघ ग लवकर, जयेश सोडतो आपल्याला." नारु अण्णा

तेवढ्यात दाराला कुलूप घालून पिशवी सांभाळत काकू गाडीत येऊन बसल्या. नेहमीप्रमाणे नारु अण्णांची बडबड परत सुरु झाली. काकूंनी दोन-तीनदा सुखदाशी बोलण्याचे प्रयत्न केला. पण नारु अण्णा बोलू देतील तर शपथ.

"काय हो तुमच्या बोलण्याच्या नादात हिला निरोप द्यायचा राहिला हो" निर्मला काकू

"नंतर बोल, गाडी लागलीय. पुढची गाडी दोन तासानी आहे. चल लवकर" नारु अण्णानी काकूंना घाई केली

"असो, यांच्या गडबडीत विसरले ग मी काय सांगणार होते." काकू निघतांना म्हणाल्या.

"हरकत नाही. आठवल्यावर सांगा काकू." सुखदा

कमल सकाळी सकाळी यायची. मदत करायची, आवरायची आणि अंतरा छोट्या कुमुदशी खेळायची. सकाळी नाश्ता करुन निघायचं. रात्री परतायचं.

हरिहरेश्वर, मुरुड जंजिरा, श्रीवर्धन, बाणकोट किल्ला, फणसड अभयारण्य, फिरण्यात आठवडा निघून गेला. अप्रतिम निसर्ग बघून जयेश वेड्यासारखे फोटो काढत होता.

दोघं रात्री ओसरीवर बसून आकाशात पसरलेलं चांदणं बघत होते. या पाच वर्षात नुसतच धकाधकीच आयुष्य जगत होते. ट्रॅफिक, गोंगाट, जीवघेण्या गर्दीपासून दूर शांत समुद्र किनाऱ्यावर फिरायचं, खूप भटकायचं, फोटो काढायचे. अंतराला पूर्ण वेळ द्यायचा. आज दोघांच हे स्वप्न पूर्ण झालं होतं. पुढच्या काही वर्षांसाठी त्यांनी उर्जेचा हा स्त्रोत ओतप्रोत भरुन घेतला होता. आकाशच्या फोनमुळे दोघेही भानावर आले. अरुंधतीच्या बहिणाला अपघात झाल्यामुळे आकाश आणि अरूंधतीचं येणं रद्द झालं होतं.

"काय करायचं, थांबायचं की जायचं?" जयेश

"इथून निघायची इच्छा तर नाही रे." सुखदा जयेशच्या खांद्यावर डोकं ठेवत म्हणाली

"ह्म्म. जायला तर हवं ना" जयेश

"हो ना. जायला तर हवं." सुखदा

"आपण उद्या निघालो तर. शुक्रवार- शनिवार बॅंकेचे आणि इतर कामं आटपून रविवारी एज युजवल सोमवारची तयारी. ऍंड देन बॅक टू रुटीन" जयेश

"वीद न्यू एनर्जी, न्यू ड्रीम्स ऍंड न्यू लाइफ." सुखदा

"ओके. ओके. आईकडे पण एक दिवस जाता येईल. तिची नाराजीही दूर होईल." जयेश

"ते जास्त महत्वाचं आहे.....आईची नाराजी दूर करणं." सुखदा

सकाळी नाश्ता करुन निघायचं ठरलं. सगळं सामान आवरुन अंतराचं खाण्या-पिण्याचं सामान घेतलं. तिला कुमुदसोबत खेळतांना बघून सुखदाने भराभर पॅकिंग केले. जयेश एकेक सामान गाडीत भरत होता.

"कमलला किती पैसे द्यायचे?" जयेश

"हजार दे न. खूप मदत झाली रे तिची आणि हो निघतांना दे" सुखदा

"ऐक ना, एवढे फोटो काढलेत, आमचा एक कमल आणि कुमुद सोबत काढ ना. आठवण राहिल रे" सुखदा

"ओके. एज यू से मॅम" जयेश

ओसरीवर फोटो काढले. अंतराच्या पाठीवर ट्विटी ची छोटी बॅग असायची. तिथल्या मार्केटमधून तिने कुमुदसाठी तशीच एक बॅग घेतली. ती तिला दिली. पैसे देतांना कमल हातात हात देऊन काही तरी सांगायचा प्रयत्न करत होती.

"कमी आहेत का? अजून देऊ का?" सुखदाने जयेशला आवाज दिला

तसा कमलने सुखदाचा हात पकडला आणि ती रडू लागली. सुखदाला कळेना नक्की काय झालं ते. तेवढ्यात जयेशने कुमुदच्या हातात पाचशेची नोट ठेवली आणि गाडीत बसलेत. कमलच्या डोळ्यातलं पाणी बघून सुखदाला गहिवरुन आलं होतं. का कोण जाणे ती ओळखीची वाटत होती. आठवड्याभरात त्या लहानशा कुमुदने जीव लावला होता. निघतांना अंतरानं जायच नाही म्हणून खूप गोंधळ घातला. अंतराला कसं बसं आवरुन सुखदा कारमध्ये बसली असली तरी कमल तिला काय सांगायचा प्रयत्न करत आहे तिला कळेना.

जाता जाता नारु अण्णा आणि काकूंचा निरोप घ्यायचा म्हणून त्यांच्या घरासमोर गाडी थांबवली. सोपस्कार म्हणून जयेश उतरला. सुखदा अंतराला घेऊन गाडीतच बसून होती. निरोप झाला. जयेश गाडीत बसणार तोच निर्मला काकू पदराला हात पुसत गाडी जवळ आल्यात.

"निघालात. या परत. आकाशला खुशाली कळवा" निर्मलाकाकू

जयेशने गाडी सुरु केली. सुखदाची काच बंद बघून जयेशकडे वळल्या आणि म्हणाल्या " अहो, तुम्हाला थोडा त्रास झाला नं"

"कशाचा हो काकू? आम्ही तर मस्त भटकलो. पुढच्या खेपेला जेवायला नक्की येऊ" जयेश गाडी सुरु करत म्हणाला.

"अरे, वय झालाय न हल्ली विसरायला होतं. सुखदाला खूप काम पुरलं असेल रे. मी सांगितले कमल येईल कामाला. ती नेमकी आजारी पडली आणि तिला तुमच्याकडे येता नाही आले. मी ही गावी निघून गेले. त्या दिवशी सांगणार होते पण राहून गेलं." निर्मला काकू

"काय रे काय म्हणत होत्या काकू?" सुखदाने गाडी वळताच विचारले

"ऐकू नाही आलं ग. एक तर अंतराच जोर जोरात रडणं त्यात मी काचही वर केलेला. काकूंच शेवटचं वाक्य ऐकू नाही आलं. मी म्हंटलं त्यांना पुढच्या खेपेस नक्की जेवायला येऊ." जयेश

"आईला फोन केला का?" जयेश

"हो रे. वाट बघतेय ती. घरी स्वयंपाक करुन ठेवते म्हणाली." सुखदा

"आईकडेच जाऊ थेट. अंतरा, ती बॅग ठेऊ दे ग मागे. रुततय मला त्यातलं काही तरी" सुखदा

हे ऐकताच अंतराने खचकन बॅग ओढली. त्यातून एक जुनाट मण्यांची छोटीशी टोपी बाहेर पडली.

"काय अंतरा. आता ही टोपी कुठे सापडली तुला?" सुखदा

एक सेकंद ती टोपी सुखदाला ओळखीची वाटली खरी. पण तिने निरखून बघायच्या आत अंतराने ओढून बॅगेत टाकली.

"सुरु झाल्या का तुम्ही मायलेकी." जयेश मिस्कीलपणे म्हणाला

"मैं फिक्र को धूँए में उडाता चला गया.... " गाण्याच्या तालावर गाडी वेगाने पुण्याच्या दिशेने निघाली.

२

"सुखदा. अंतरा......." जयेशने कण्हत आवाज दिला

"डॉक्टर.....डॉक्टर.... " रत्ना ने जोरात हाक दिली. तशी एक सिस्टर धावत आली.

जयेश शुद्धीवर आला खरा. त्याला काहीच कळत नव्हतं. जड झालेले डोळे कसेबसे उघडत त्यानं आजूबाजूला नजर टाकली.

त्याला हॉस्पिटलमध्ये असल्याची जाणीव झाली. आत्ता तर ते दिवेआगरहून निघाले होते.

तो अजून काही विचार करणार तेवढ्यात डॉक्टरांनी इंजेक्शन दिलं. त्याला परत गुंगी आली.

"डॉक्टर..." रत्नाने आवंढा आवरत आवाज दिला.

"ही इज आऊट ऑफ डेंजर. आम्ही प्रयत्न करतोय. खूप मार लागलाय. वेळ तर लागेलच." डॉक्टर

"डॉक्टर, सुखदा आणि अंतरा कसे आहेत?" रत्ना

"न्युरॉलॉजिस्ट येत आहेत. प्रकृती गंभीर आहे. सगळे रिपोर्ट्स येईपर्यंत काहीच सांगू शकत नाही. वी वील डू अवर बेस्ट" डॉक्टर

"जस्ट प्रे." सिस्टर

"आत्या, आत्या," परेशच्या हाकेनी रत्ना भानावर आली.

"कसा झाला ग हा अपघात?" परेश

"पोलिस येतील एवढ्यात. मला त्यांनीच कळवलं. ताम्हणी घाटाच्या आसपास झाला. जवळच्या दवाखाण्यात नेलं होतं आधी. नंतर इथे मंगेशकरमध्ये आणलं." रत्ना

"कसा झाला याचा तपास करत आहेत ते." रत्ना

"जयेश उत्तम गाडी चालवतो रे. मग हा अपघात कसा झाला असेल?" रत्ना

"आत्या, कॉफी घ्या दोन बिस्किट खा. बरं वाटेल." पूर्वा

"तुम्ही घरी जाता का थोडा वेळ. मी आहे इथे." पूर्वा

"नको ग, मी इथेच थांबते. जयेश शुद्धीवर आला की सांगेल सगळं" रत्ना

"काळजी नका करु आत्या. सगळ ठीक होईल." पूर्वा रत्नाचा हात हातात घेत म्हणाली

"जयेशच्या ऑफिसमधून त्याचे मित्र आले होते. ते पौडच्या पोलिस स्टेशनवर गेले आहेत. येतीलच एवढ्यात. कसं? काय झालं? काही माहित नाही बघ. निघतांना मला फोन केला होता. घरी येऊन जेवणार होते दोघं. अंतराही बोलली माझ्याशी. मी जेवणाची तयारी करत होते आणि थोड्यावेळात अपघाताचा फोन आला." रत्ना

"आत्या, जयेशचे आई बाबा सुरतवरुन निघालेत. पोहचतील थोड्यावेळात." परेश

"रत्ना काकू... इनश्यूरन्स डिपार्टमेंटमध्ये बोलवलय. पाचव्या मजल्यावर आहे." स्वरा

"स्वरा, तू?" पूर्वा

"अगं! काकूंना फोन आला आणि त्यांनी आम्हाला कळवलं. मी आणि बाबा इथे घेऊन आलो त्यांना." स्वरा

"अजून काही कळलं का?" परेश

"नाही. काहीच माहिती नाही. बाबा इनश्यूरन्स डिपार्टमेंटमध्ये वाट बघत आहेत." स्वरा

"तुम्ही जाऊन येता का? मी थांबते इथे." स्वरा

"पोरं शुद्धीवर येतीलच हो इतक्यात. न्यूरॉलॉजिस्ट येणार आहेत न" रत्ना

"ते काय म्हणतात, काय ट्रीटमेंट देतात…." रत्ना हुंदका दाबत म्हणाली

"आत्या, आत्या… स्वरा थांबेल इथे आणि आलेच शुद्धीवर तर फोनकरुन कळवेल आपल्याला. चल, इनश्यूरन्सचं काम करुन येऊ." परेशने रत्नाला उठवत म्हंटलं

"तसं ऑफिसच्या लोकांनी फॉरमॅलिटिज् पूर्ण केल्या आहेत. तुम्हाला औषधांसाठी काही अडचण आली तर सांगा. इथे सही करा" गुलाबी ऍप्रन घातलेली एक बाई म्हणाली.

इन्स्युरन्सचं काम आटपून परेश तिला बळजबरीने कॅन्टीनमध्ये घेऊन गेला.

"काय रे ही पोरं, रोजचं धावपळीच्या आयुष्याला कंटाळून चार दिवस फिरायला गेले आणि हे काय होऊन बसलं." रत्ना

"होईल सगळं नीट. काळजी नको करु. त्यांना सावरायला तू धडधाकट हवीस न. दोन घास खाऊन घे" परेशने आग्रह केला.

आय सी यूमध्ये दोघंही परत आले तेव्हा जयेशच्या ऑफिसचे मित्र जमले होते.

"जयेशच्या ऑफिसमधून पौड चौकीवर कोणी जाऊन आलं होतं ना रे त्यांच्याकडून काही कळलं का? रत्ना

"अपघाताच्या वेळेस दुसरं कुठलंही वाहन जवळपास नव्हतं. जवळच चहाची टपरी आहे. त्या चहावाल्यानेच दूरुन बघितलं. तोच सांगत होता. वळणावर एकाएकी ब्रेक दाबला आणि गाडी झाडावर आदळली. त्यानेच पोलिस व जवळच्या गावातल्या लोकांना बोलवलं.इतर वाहन किंवा कोणी लोकं रोडवर नव्हतीच." शुभांकर

"कशामुळे अचानक ब्रेक लावला हे काही कळलं नाही." दिनेश

"गाडी पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. रस्त्यावर जे सामान पडलं होतं ते तुम्हाला पाठवलय म्हणे. इतर सामान चेक करायला पोलिस स्टेशनवर बोलवलय." शुभांकर

"गाडीतही काही बिघाड नाही" दिनेश

जयेश एवढा निष्णात ड्रायवर, गाडीत बिघाड झाला नव्हता. रस्त्यावर इतर वाहन, व्यक्ती वा प्राणी कोणीच नसतांना असा अपघात होईलच कसा...ताबा सुटायला भांडण वैगरे

काही.....जमलेल्या घोळक्याचे तर्क वितर्क चालले होते. आणि रत्ना मनोमन तिघांच्या आयुष्यासाठी देवाला आळवत होती.

ग्लोवबॉक्सवर जोरात आदळल्यामुळे अंतरा आणि सुखदा दोघींना जब्बर मार लागला होता. त्या अजूनही शुद्धीवर आल्या नव्हत्या. अनेक टेस्ट...ट्रीटमेंट सुरु झाली होती.

तेवढ्यात आकाश पाटिलचा ऑफिसच्या एका कलिगच्या मोबाइलवर फोन आला.

"हॅलो, काकू...मी आकाश....कसे आहेत तिघही....मी पोहतोच उद्या"  आकाश

आकाश पोहचला तरी तिघांपैकी अजून कोणीच शुद्धीवर आलं नव्हतं. सुन्न झालेल्या आकाशला काहीच कळत नव्हतं. उमगत नव्हतं.

"माझ्या साळीचा अपघात झाला म्हणून मला दिवेआगरला जाता आले नाही." आकाश

"काल आमचे दिवेआगरचे  शेजारी नारुअण्णांना फोन केला होता. तेव्हा त्यांच्याकडून काही गोष्टी कळल्यात. त्याचा अपघाताशी काही संबध आहे का माहित नाही." आकाश

का रे, काय झालं? मी तर रोजच बोलत होते तिच्याशी. ते तिथे असतांना सगळं काही ठीक होतं. कितीतरी फोटो पाठवलेत त्यांनी मला." रत्ना

आणि तुझ्या नारु आण्णानेच तर कमल नावाच्या मुलीला पाठवले होते न, खूप मदत केली तिने या दोघांना." रत्ना

"नारु अण्णा पाठवणार होते. अचानक ती कमल नावाची मुलगी आजारी पडली. ती येऊ शकली नाही. हेच जयेश आणि सुखदाला निर्मलाकाकूंनी निघतांना सांगितलं." आकाश

"कसं शक्य आहे. मला आठवतय, प्रत्येक वेळेस सुखदा मला तिच्याबद्दल सांगायची. तिच्या सोबत कुमुद नावाची लहान मुलगी पण यायची. ती आमच्या अंतरासोबत खेळायची" रत्ना

"नारुअण्णाचा निरोप घेतल्यावर मला सुखदाचा फोन होता. म्हणजे तोवर सर्व व्यवस्थित होतं. मग आता ही कमल काय भानगड आहे." रत्ना

रत्नाचं अवसान गळालं होतं. तिला काहीच कळत नव्हतं. आकाशनी दिलेली ही धक्कादायक माहिती. त्या क्षणी नक्की काय घडतय हे एक कोडच होतं. आपण आजवर किती काळजी घेतली. पण...पण नियतीने आपला डाव साधलाच. रत्ना देवाचा धावा करत होती.

"काकू पोलिस आलेत. कारजवळ जे सामान सापडलं त्याची ओळख पटवून द्यायची आहे." स्वरा

पोलिसांनी एक पुडकं दिलं. त्यातल्या एक एक वस्तू परेश टेबलवर काढत होता. सुखदाचं घड्याळ, अंतराचा रुमाल, जयेशचा फुटलेला मोबाईल, सोन्याची चेन, गॉगल, परफ्युम, अंतराची बॅग बघताच रत्नाला रडू आवरलं नाही. पूर्वाने त्या बागेतून एक मण्यांची टोपी काढली आणि ती बघता क्षणी रत्नाला जो धक्का बसला. नाही नाही हे शक्य नाही म्हणत ती चक्कर येऊन पडली.

"सुखदा....अंतरा...." रत्ना कण्हत उठली

"आत्या, काय झालं?" परेशनं काळजीनं विचारलं

"ती परत आली...चिनुला बोलव." रत्ना

"हो हो, बाबा पोहचतीलच एवढ्यात." परेश

"काय झालं रत्ना ताई? " जयेशच्या आईने विचारले

"गर्दी करु नका त्यांच्या जवळ. ऑलरेडी त्या टेन्स आहेत. प्लीज वेट आऊट साईड" सिस्टर

"कोणी एकच जण थांबता का प्लीज" सिस्टर

"पूर्वा, जा बाबा खाली गेटवर आहेत. तू घेऊन ये त्यांना" परेश

रत्ना थरथर कापत होती. परेशला काहीच कळत नव्हतं. एकाएकी आत्याला कसचा धक्का बसला. तेवढ्या पूर्वा बाबांना घेऊन आलीच.

"चिनू ......ती परत आली रे..... माझ्या सुखदाला घेऊन जायला" रत्ना चिन्मयला बघताच ओरडून म्हणाली

"ताई, सगळं ठिक होईल." चिन्मय रत्नाला जवळ घेत म्हणाला

"तरी मी सुखदाला सांगत होते नको जाऊस. ऐकलं नाही रे पोरीनी" रत्नाचे हुंदके थांबत नव्हते

"काळजी नको करु. मी बघतो." चिन्मय

"बाबा, काय झालं आहे नक्की. सांगता का प्लीज? त्या टोपीकडे पाहून आत्या एवढी अस्वस्थ का झाली?" परेश

"बाबा, प्लीज. आम्ही सगळेच काळजीत आहोत. तुम्ही काही सांगितलं तर काही उपाय शोधता येईल आपल्याला." पूर्वा

"साधारण अठ्ठावीस- तीस वर्षापूर्वी घडलं होतं हे. ताई भावजी आणि इतर भावंड आम्ही आमच्या एका मावस भावाच्या लग्नाला दिवेआगरला गेलो होतो. सुखदा तेव्हा जेमतेम तीन सव्वा तीन वर्षाची असेल. तिथे मुलीची एक दूरची वहिनी आली होती. रंजना तिचं नाव, ती जवळच्याच गावातून

लग्नघरात घरकामासाठी आली होती. तिची मुलगी कुमुद आणि सुखदाची छान मैत्री जमली. दोन दिवस त्या खूप खेळल्या.

मी गोव्यावरुन सुखदासाठी आणलेली एक मण्यांची टोपी होती. सुखदा त्या टोपीला कोणालाही हात लावू देत नसे.

वरातीच्या वेळेस सुखदाने ती टोपी घालायचा हट्ट केला. त्या दिवशी सकाळ पासूनच त्या दोघींचा अंगणात खूप धिंगाणा सुरु होता. वरात निघतांना त्या अंगणातंच खेळत होत्या. याच मण्याच्या टोपीवरुनं त्यांचं भांडण झालं. त्यात वरातीची गडबड, रडणं, या सर्व गोंधळात त्या दोघी भांडत भांडत मागच्या अंगणात केव्हा गेल्या कळलच नाही. सुखदाचा धक्का लागला आणि कुमुद टाकीत पडली.

टाकी खोल नसली तरी आम्ही पोहचेपर्यंत वेळ लागला. तिला दवाखाण्यात नेण्यात आलं. ती रात्र कशीबशी काढून दुसऱ्या दिवशी आम्ही पुण्याला निघून आलो. लग्नघरी रहाणार तरी किती दिवस.

काही दिवसांनी कळलं तिचा प्राण वाचला. आमच्या जीवात जीव आला. पण काही दिवसातच परत निरोप आला की ती गेली. निमोनिया झाला होता तिला. रंजनाचा नवरा एका अपघातात गेला होता. त्याच्यानंतर त्या दोघीच एकमेकींचा आधार होत्या. रंजना स्थानिक रिसोर्ट आणि गरज पडेल तिथे घरकाम करुन आपलं व तिचं पोट भरत होती. आधी नवरा मग लेक, वर्षभरातच झालेले हे आघात रंजना सहन करु शकली नाही. तिने आत्महत्या केली."

हे प्रकरण संपल असं समजून आम्ही झाला तो प्रकार सुखदाला कधीच न सांगण्याचा निर्णय घेतला. खरं तर झाला होता तो एक अपघात होता. परंतु या अपघातामुळे रंजनाचं आयुष्या उध्वस्त झालं हे ही खरंच होतं. या बाबतीत आम्ही काहीही करु शकत नसल्याची खंत रत्नाला नेहमीच त्रस्त करत असे."

"नाही.....आपण काही तरी करु शकलो असतो चिन्मय. आपण कुमुदला मोठ्या दवाखाण्यात नेऊ शकलो असतो. कदाचित ती वाचली असती. आपण रंजनालाही वाचवू शकलो असतो. आपण कुमुद गेल्यावर तिला भेटायला सुद्धा गेलो नाही. आपण तिला सावरु शकलो असतो. तिला इथे पुण्यात आणू शकलो असतो. तिला दुखातून सावरायला हवं होतं आपण. आपण चुकलोच रे. चुकलोच आपण.

हा अपघात झाला तेव्हा निर्णयाच्या वेळेस एक पाऊल मागे घेण्याऐवजी पुढे घेतले असते तर आज माझी सुखदा मृत्युच्या दारात नसती रे. " रत्ना रडून रडून सांगत होती.

"आपण पळून गेलो, हेच आपलं चुकलं आणि आत्ता जे भोगतोय ती त्या चुकीची शिक्षा आहे चिन्मय" रत्ना

आयुष्यात पुढे असं काही होईल याची कल्पना आपल्याला नव्हती रत्ना. कोण चुक...कोण बरोबर....हा न्याय की अन्याय.....काहीच सांगू शकत नाही. यावर उपाय काही आहे का? हे ही ठाऊक नाही."

"मी ही मण्यांची टोपी कशाला विकत घेतली. सगळ काही या टोपीमुळेच झालं. याचा मात्र आज पश्चाताप होतोय, हे ही खरच" चिन्मय ओक्साबोक्शी रडू लागला.

"बाबा, या सगळ्या प्रकरणात चुक कोणाचीच नाहीया. यावर काही तरी तर उपाय नक्की असणार." मण्यांची टोपी हातात घेत पूर्वा म्हणाली.

"परेश, मधुमंजिरी आठवतेय. ती अश्विनच्या पार्टीत आली होती. ती पॅरनॉर्मल अक्टिवीटीज्वर रिसर्च करत आहे. अश्विनकडून नंबर आणि पत्ता घे तिचा. ती नक्की मदत करेल." पूर्वा

पूर्वाचं बोलणं ऐकून रत्ना, स्वरा, चिन्मय, परेश, जयेशचे आई-वडिल सर्वांनाच थोडासा धीर आला. सर्वच सुखदा-अंतरा-जयेशसाठी प्रार्थना करु लागले. रत्ना आत्या, बाबा यांनी त्या वेळेस जे केलं ते चूक की बरोबर यावर चर्चा करत बसण्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकत यावरचा उपाय शोधायचं तिनं ठरवलं. पूर्वा मधुमंजिरीकडे मण्यांची टोपी घेऊन निघाली....

३

पूर्वा मधुमंजिरीच्या घरी पोहचली. तिने घाबरतच बेल वाजवली. सभोवताल एक नजर टाकली. तिला भयाण शांततेची आणि सिनेमा/सिरिअलमध्ये दाखवतात तशा वातावरणाची अपेक्षा होती, पण छे....असं काहीच नहतं. मुख्य दरवाजाच्या पुढे सुरेख रांगोळी काढली होती. वाऱ्यासोबत हेलकावणाऱ्या मंद विन्डचिमच्या नादामुळे वातावरण प्रसन्न होते.

"हाय, ये. मी तुझीच वाट बघत होते. मघाशीच अश्विनचा फोन येऊन गेला." मधुमंजिरी हसत दार उघडत म्हणाली

"आपण अश्विनच्या पार्टीत भेटलो होतो." पूर्वा संदर्भ देत म्हणाली

"हो, आठवतय मला. कॉफी घेणार?" मधुमंजिरी

"ह्म्म.चालेल" पूर्वा

"पूर्वा, आधीच सांगते मी पॅरानॉर्मल ॲक्टिविटीज्वर रिसर्च करतेय, तुझ्या केसमध्ये तुला मदत करण्याचा मी शंभरटक्के प्रयत्न करणार, पण या गोष्टी वाटतं तितक्या लवकर होतात असं नाही. नक्की प्रॉब्लेम काय? आणि त्याचं सोल्युशन मिळेपर्यन्त किती वेळ लागेल मी सांगू शकत नाही. इटस अ मॅटर ऑफ पेशन्स. आर यू रेडी?" मधुमंजिरी

"यस आय एम रेडी. आय विल बी पेशन्ट. नो हरी. आय वॉन्ट परमनंट सोल्युशन. आणि सांगू माझ्याकडे दुसरा पर्याय नाही ग. मी पण माझ्या पातळीवर हा प्रयत्नच करते आहे." पूर्वा

मग पूर्वाने मण्यांची टोपी..ते भांडण...अपघाताने टाकीत पडलेली कुमुद, सुखदा आणि तिचे आई,बाबा आणि मामाचं अपघातस्थळावरुन काढलेला पळ, कुमुदचा मृत्यु, रंजनाची आत्महत्या, सुखदाचं दिवेआगारला फिरायला जाणं, तिथे कमल नावाच्या बाईचं कुमुद नावाच्या एका लहान

मुलीसोबत कामाला येणं, तिच्या अस्तित्वाबद्दलची साशंकता, अंतराच्या बॅगमध्ये सापडलेली ती जुनी टोपी....आणि सुखदा, अंतरा आणि जयेशचा अनाकलनीय अपघात...सारंसारं काही सांगितलं.

"सो दिस इज् द होल स्टोरी." मधुमंजिरी

"यात कुठेही रिवेन्ज दिसत नाही गं. रंजना किंवा कुमुदला बदला घ्यायचा असता तर दिवेआगरच्या वास्तव्यात तिला तो घेणं सहज शक्य होतं. तिने तसं केलं नाही." मधुमंजिरी

"मग गाडीचा अपघात? पोलिसांचा रिपोर्ट आणि साक्षीदारांच्या मते रस्त्यावर तेव्हा कोणीही नव्हतं. जयेश सारख्या एक्स्पर्टचा अचानक ताबा सुटणे हे मान्य होत नाहीया." पूर्वा

"मला ती टोपी बघायला मिळेल का?"

"मी आणली आहे न." पूर्वा बॅगमधून टोपी काढत म्हणाली

"तू चक्क एविडन्स आणला?" मधुमंजिरी

"रिक्वेस्ट केली मी पोलिसांना. आणि या टोपीत असं काही विशेष त्यांना वाटलं नाही." पूर्वा

"खूप जुनी असली तरी ती सांभाळून ठेवली होती असं दिसतय." मधुमंजिरी टोपी हातात घेत म्हणाली

"अंतरा, सुखदा जयेश या क्षणी हॉस्पिटलमध्ये क्रिटीकल आहेत. ते या टोपीमुळे, असं रत्नाआत्या सांगत होत्या." पूर्वा

"मला रत्नाआत्या आणि तुझे सासरे अर्थात चिन्मयकाकांना भेटता येईल?" मधुमंजिरी

"हो. येईल न. ते दवाखान्यात आहेत." पूर्वा

"चल मग. लगेच निघू या." मधुमंजिरी

दोघी दवाखान्यात पोहचल्या. सुखदा आणि अंतराच्या तब्येतीत सुधारणा होती. जयेश अगदी काही क्षणांसाठी शुद्धीवर आला होता. त्यामुळे अपघाताच्या वेळी नक्की काय घडलं हे कळायला वेळ लागणार होता. जीवावरचं संकट टळलं असलं तरी डॉक्टरांच्यामते येणाऱ्या अठ्ठेचाळीसतासानंतर जयेश पूर्णपणे शुद्धीवर येऊन काही सांगण्याची शक्यता होती.

रत्नाआत्या आणि चिन्मयकाकाने जे घडलं ते तंतोतंत सांगितलं असलं तरी मधुमंजिरीला कुठलातरी एक धागा सुटल्यासारखा वाटत होता.

"मला जयेशला जवळून बघायचं आहे. प्लीज सगळे रुमच्या बाहेर जाता का? सिस्टर तुम्ही थांबा." मधुमंजिरी

"मॅडम, अहो डॉक्टर याची परमिशन देणार नाही." सिस्टर

"मला कळतं हो. पण यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. प्लीज." मधुमंजिरी

रत्ना, पूर्वा, परेश यांच्या आग्रहास्तोवर सिस्टर तयार झाली.

"मला या रिपोर्टसबद्दल सांगा. यांच्या शरीरावर काही व्रण, एखादं चिन्ह किंवा खूणा ज्या तुम्हाला विचित्र वाटल्या." मधुमंजिरी

"पेशंटच्या संपूर्ण शरीरावर जखमाच जखमा आहेत हो. मल्टीपलफ्रॅक्चर आहे." सिस्टर

"आठवून बघा सिस्टर. प्लीज. झालेल्या जखमांपेक्षा थोडी वेगळी किंवा तुम्हाला खटकलेली. अगदी छोट्यातली छोटी गोष्ट मला मदतीची ठरेल." मधुमंजिरी विनवणीच्या सुरात म्हणाली

"अं...हो, मानेवर बाजूला एक वेगळीच खूण आहे. अगदी छोटीशी आहे. फ्रेश वुंड नाही. फारपूर्वी लागलं असावं किंवा बर्थ मार्क असावा मला वाटलं. हे बघा" सिस्टर जयेशची मान अलगद उचलत दाखवू लागली.

मधुमंजिरीने त्या चिन्हाचे क्लोजप फोटो काढलेत.

"सिस्टर, मला सुखदा आणि अंतराला असच जवळून बघायचं आहे." मधुमंजिरी

"त्या वॉर्डमध्ये मी तुम्हाला नेऊ शकते, पण ड्युटीवर दुसरी नर्स असणार. ती परमिशन देणार का मला माहित नाही." सिस्टर

"प्लीज. सिस्टर हेल्प अस." पूर्वाने विनवणी केली.

"दवाखान्यात ते ही आयसीयुमध्ये अशा गोष्टींना परवानगी नसते हो." सिस्टर

"ओके, एक काम करा. तुम्हीच त्या सिस्टरला विचारा की सुखदा आणि अंतराच्या शरीरावर अश्याप्रकारची कुठेही खूण आहे का?" मधुमंजिरी

"प्लीज सिस्टर." पूर्वा आणि परेश दोघं तिला गळ घालत होते.

"ओके..ओके...विचारते." सिस्टर

"असेल तर प्लीज क्लोजप फोटो घ्या हं." मधुमंजिरी तिला मोबाईल देत म्हणाली

"मी सकाळपासून सगळं बघतेय...ऐकतेय..परिस्थितीचं गांभीर्य बघता मी ही मदत करते आहे. माझ्या नोकरीवर संकट नको." सिस्टर

"नाही कसलच सकंट येणार नाही. प्लीज सिस्टर." मधुमंजिरी हात जोडत म्हणाली

सिस्टरनी फोटो काढलेत. दोघींच्या मानेवर तशाच खूणा बघून मधुमंजिरीनं जे सांगितलं त्यावर कोणाचा विश्वास बसला नाही.

"जे घडलं ते दिवेआगरहून निघाल्यानंतर मधे कुठेतरी घडलं आहे. नक्की काय? हे अपघातस्थळावर आणि दिवेआगरला गेल्याशिवाय कळणार नाही." मधुमंजिरी

"परेश आणि पूर्वा, तुम्ही इथेच दवाखान्यात थांबा. मला दिवेआगरला जावं लागेल. माझ्याजवळ पुढचे अठ्ठेचाळीस तास आहे. या वेळेत सगळं शोधायचं आहे." मधुमंजिरी

"मी येतो, मला दिवेआगरची सगळी माहिती आहे." आकाश

"अपघात कशामुळे झाला आधी हे शोधायला हवं. आकाश, पोलिसांकडून सगळे डिटेल्स घे. कॅमेरातले फोटो रिकवर झाले का बघ. झाले असतील तर मला मेल कर. आपण उद्या पहाटे साडेपाचला निघू," मधुमंजिरी

"ओके. मी नारु अण्णा आणि निर्मलाकाकूंना या प्रकरणाची चौकशी करायला सांगतो. अख्खा आगर त्यांच्या परिचयाचा आहे." आकाश

"परेश, मला आत्या आणि काकांशी परत एकदा बोलायचं आहे. त्यांनी सांगितलेल्या तपशिलात काहीतरी मिसींग आहे." मधुमंजिरी

"आत्या, प्लिज परत तो प्रसंग आठवा. काहीतरी मिसिंग आहे." मधुमंजिरी

"सगळं सांगितलं ग...." रत्नाआत्या डोळे मिटत म्हणाली

"ही खूण बघा आत्या.... ओळखीची वाटत आहे का?" मधुमंजिरी

"परत एकदा दाखव ती खूण.....बघितल्यासारखी वाटते ग." रत्ना

"आत्या, आठवायचा प्रयत्न करा प्लीज." पूर्वा रत्नाला म्हणाली

"ही खूण मी लग्नात बघितली आहे......" रत्ना आठवायचा प्रयत्न करु लागली

मधुमंजिरी दवाखान्यातील बेंचवर बसून घटनाक्रम लावत होती. संकर्षणला फोनकरुन या घटनेची माहिती द्यायला हवी. खरच. संकर्षणला आधीच फोन करायला हवा होता. लक्षात येताच तिने फोनवर सगळे अपडेटस दिले. त्या खूणांचे फोटो त्याला पाठवले.

"मधु. मला वाटत एक धागा सुटतोय या सगळयात. रिवेन्ज नसेल हा. माझा अनुभव हेच सांगतोय." संकर्षण

"रत्ना आत्याला आठवत का काही बघायला हवं." मधु

"या कथेतील ती कडी मिळताच मला कळव. थोडा वेळ दे. मी तुला त्या चिन्हांबद्दल कळवतो." संकर्षण

"मी रत्ना आत्याला आठवायला मदत करते." मधुने फोन ठेवला आणि रत्ना आत्याकडे गेली

"आठवायचा प्रयत्न करतात आहे आत्या." पूर्वा मधुमंजिरीला आत येताच म्हणाली

"आत्या, तो प्रसंग आठवा ना. लग्नाची गडबड.....काही वेगळं घडलं होतं का?" मधुमंजिरी

"आम्ही बायका वरातीसाठी तयार होत होतो." आत्या

"तेव्हा काही विशेष जाणवलं होतं का तुम्हाला." पूर्वा

"सुखदा आणि कुमुदला मी तयार केलं. दोघींना सारख्या वेण्या घालून दिल्यात. एकाच रंगाचे बो बांधून दिले होते मी त्यांना." रत्ना

"अजून..." मधुमंजिरी

"तयार होऊन त्या दोघी खेळायला निघून गेल्यात. तेवढ्यात .....तेवढ्यात .." रत्ना

"तेवढ्यात काय आत्या?" पूर्वा

"आमच्या खोलीत फार गर्दी नसल्याने मुलीकडची काही मंडळी आमच्या खोलीत तयार व्हायला आली." रत्ना

"पुढे....तेव्हा काही विशेष घडलं होतं का?" मधुमंजिरी

"हो......मुलीच्या एका दूरच्या काकूने सेफ्टी पिन मागितली. त्यांच्या हातावर पिन ठेवतांना मला अशीच खूण दिसली होती." रत्ना

"कोण...कोण होती ती." मधुमंजिरी

"तिचं नाव माझ्या मावसभावाला विचारता येईल. पण तिचा आणि या खूणांचा काय संबंध? ही घटना तर बावीस-तेवीस वर्षांपूर्वी घडली होती." रत्नाआत्या

"ते मी शोधते आत्या. परेश, आत्या म्हणतात त्यांच नाव, पत्ता, सगळे डिटेल्स मला मॅसेज कर. आणि हो, हे तिघांच्या उजव्या पायाला बांधा" मधुमंजिरी बॅगमधून काळा दोरा काढत म्हणाली

तेवढ्यात संकर्षणचा फोन आला.

"तुझा अंदाज बरोब्बर आहे. हे प्रकरण दिसतं तसं नाही. टोपीवरुन कुमुदने सुखदाला कम्युनिकेट करण्याचा प्रयत्न केला असावा. खरं काय ते दिवेआगारला गेल्यावर कळेल. या खूणा म्हणजे चिन्ह आहेत, दे आर साईन ऑफ डेथ. डिटेल्स मी तुला मेल करतो." संकर्षण

"तुला जमेल का रे यायला. तू सोबत असल्यावर लवकर सुटेल हा गुंता. आणि हा गुंता सुटल्याशिवाय या तिघांची सुटका होणार नाही. ते तिघंही असेच जीवनमृत्युच्या मध्यात अडकले रहातील." मधुमंजिरी संकर्षणला म्हणाली

"मी कोल्हापूरवरुन निघालो आहे. रात्री बारापर्यंत्न पोहचतो. सकाळी जॉईन होतो तुम्हाला." संकर्षण

"काय झालं?" पूर्वा

"त्या खूणा....यांच्या अपघाताचं कारण आहे." मधुमंजिरी

"त्या व्यक्तीबद्दल कळायलाच हवं...ती व्यक्तीच हा गुंता सोडवू शकते." मधुमंजिरी

"आणि ही मण्यांची टोपी?" पूर्वा

"दिवेआगरला गेल्यावर कळेल...." मधुमंजिरी

"ओके. रत्नाआत्या आणि काका काळजी करु नका. आणि हो कुमुदमुळे हा अपघात झालेला नसावा. तिघांच्या मानेवर असलेल्या चिन्हांवरुन अपघात झाल्याचं वाटत आहे. तुम्ही देवाजवळ प्रार्थना करा. मी संकर्षणच्या मदतीनं खरं काय ते शोधते.

"चल आकाश उद्या भेटू." म्हणत मंजिरी निघाली

आकाश कामाला लागला. पोलिसांनी कॅमेरामधले काही फोटो रिकव्हर केले होते. त्यात केसला काही मदत होइल असे काही नव्हतं रत्नाआत्याच्या फोनमधल्या कुठल्याच फोटोमध्ये कुमुद आणि कमल अर्थात रंजनाचा फोटो नव्हता.

त्या काकूंबद्दल माहिती मिळाली होती. ते फोटो, चिन्हांचा अर्थ आणि घडलेल्या घटनांचा क्रम लावत मधुमंजिरीचा मध्यरात्री केव्हातरी डोळा लागला. पाचवाजता अलार्म वाजला. तिने सर्व आवरलं. पुजा केली आणि संकर्षण, आकाशची वाट बघू लागली. ठरल्याप्रमाणे ते तिघं दिवेआगारला निघाले. पौड गाव सोडताच घाट लागला. घाट संपता संपता अपघाताचा स्पॉट आला. मधुमंजिरीने सगळा भाग परत परत शोधला. तिला हवे असलेले संकेत तिला थोड्यादूरवर मिळाले होते. अपघाताचे कारण लक्षात आले असले तरी ती प्रतिमाकाकू...आणि मण्यांची टोपी या गोष्टींचा नक्की काय संबंध हे तिला कळत नव्हतं.

"मधु, या टोपीच्या आत काही आहे बघ.....नीट लक्षपूर्वक बघ....हे चिन्ह.....त्या डेथ साईनला क्रॉस करणारे साईन आहे. या चिन्हांमुळे तिघांचे प्राण वाचलेत मधु." संकर्षणने मण्यांची टोपी पडताळून पहातांना त्याच्या लक्षात आले.

"याचा अर्थ कुमुद सुखदाला वाचवायचा प्रयत्न करत होती." संकर्षण

"एक मिनिट. मला जरा समजवून सांगता का?" मला काहीच कळत नाहीया." आकाश

"बस्स....आता नारुअण्णाकडून माहिती घेतली कि त्या प्रतिमाकाकूकडे जाऊन याचा छडा लावू आपण." संकर्षण

"नारु अण्णाशी बोलून सांगतो तुला आकाश...." मधु

"नारु अण्णा...निर्मलाकाकू....काही माहिती मिळाली का?" आकाशने गाडीतून उतरत विचारलं

"कसे आहेत तिघं?" निर्मलाकाकू

"गंडांतर अजून टळलं नाही...प्रतिमाकाकूबद्दल काय माहिती..."संकर्षण

"हो, प्रतिमा जाधव, अगोदर आमच्या आगरात रहायची. तिची मुलगी कुठल्यातरी आजाराने अवेळी गेली. मग ती शेजारच्या गावात जाऊन राहू लागली. ती करणी करायची म्हणे." निर्मलाकाकू

"हो, गावातले सांगतात. तिची मुलगी गेल्यावर गावातली एक पोरगी बेपत्ता झाली होती. लोकांनी त्या मुलीला शेवटचं प्रतिमासोबत बघितलं होतं." नारु अण्णा

"नारु अण्णा, पोलिस चौकी कुठे आहे?" मधु

पोलिसांना घेऊन आकाश, संकर्षण आणि मधुमंजिरी प्रतिमाच्या शोधात शेजारच्या गावात निघाले. रस्त्यात त्यांनी पोलिसांना झालेली घटना सांगितली. बळीचा प्रकार होता.

"कोकणात लपून छपून होतात हे प्रकार. पण कोणी हाती लागत नाही. तुम्ही म्हणता तसं झालं असेल तर प्रतिमाला ताब्यात घेऊ आपण" पोलिस इंस्पेक्टर

ते सर्व प्रतिमाच्या घरी पोहचले. निर्जन जागी ती दोन मजली ती वास्तु ऐन दुपारी भयाण वाटत होती. प्रतिमा घरी असावी. आतून आवाज येत होता. पोलिसांनी बेसावध प्रतिमाला पकडलं. संकर्षणनी आधी तिचे हात पाय बांधून ठेवले.

"सांग, तू त्या तिघांना घाटात कसं गाठलं? अपघात कसा झाला?" पोलिस

"मी त्यांना जिवंत सोडणार नाही.... सुखदा वाचली असेल ....आता तिचा आणि अंतराचा बळी घेतला की माझी लेक परत येणार..." प्रतिमा ओरडून सांगत होती.

"बळी दिल्याने कोणी परत येत नसतं..." मधुमंजिरी चिडून म्हणाली

"हा...आधी ती सुखदा आडवी आली......दुसऱ्यांदा कुमुद आडवी आली....नाही तर माझी लेक माझ्याजवळ आली असती." प्रतिमा

"सांगते कि नाही सगळं" पोलिसांनी दंडा उगारताच प्रतिमा बोलू लागली

"सुगानबाबानं सांगितलं होतं मला..."तुझ्या पोरीच्या वयाची अन तिच्या आईचा बळी दे....तुझी लेक परत येईल म्हणून..." मी एकदा गावातलीच पोरगी उचलली. पण तेव्हा तिची आई हाती आली नाही. तो बळी वाया गेला. नंतर एका दूरच्या नात्यात लग्न होतं. तिथं मला या दोघी रंजना आणि कुमुद भेटल्या. कुमुदची आई तशी साधी होती. "माझ्याकडे काम आहे" असं बोलून मी तिचं मन वळवलं होतं. आधी लग्नाघरातलं काम संपल्यावर ती माझ्याकडे यायला तयार झाली होती. पण सुखदा आणि तिची आई रंजनाला व कुमुदला पुण्याला नेण्याच्या गोष्टी करु लागल्या. एका मेसमध्ये पूर्णवेळ काम करणारी महिला पाहिजे होती. रंजनाचं मन बदललं. पोरीच्या शिक्षणाची जवाबदारी सुखदाची आई घ्यायला तयार होती. मला राग आला. वरातीच्या वेळेस कुमुद आणि सुखदा खेळत मागे अंगणात गेल्या तेव्हा मी कुमुदला उचलायचा प्रयत्न केला तशी ती सुखदा जोरजोरात रडायला लागली...लोकं जमतील म्हणून मी कुमुदला ढकललं तर ती पाण्याच्या टाकीत पडली. मी तिथून निसटली. काही दिवसांनी कळलं की कुमुद गेली आणि तिच्या आईनी आत्महत्या केली. तो बळी वाया गेला." प्रतिमा

"इतक्या वर्षांनी सुखदाला कसं ओळखलं? पोलिसांनी दांडा उगारत विचारलं

"मी ओळखलं नाही साहेब. खरच. पोरी शप्पथ ही ती सुखदा आहे, मला माहित नव्हतं." प्रतिमा

"लोकांना मी जादू टोना करते लक्षात आलं. ते सावध झाले. म्हणून काही वर्ष गप्प बसले." प्रतिमा

"नंतर वशीकरण आणि जादूटोना शिकायला मी तळ कोकणात गेले. आता लोकांना भुल घालणं सोप्प नाही साहेब. गावी परत येऊन वर्ष झालं साहेब. पण हवी तशी मायलेकीची जोडी सापडली नाही. मला वाटत होतं आता माझी लेक परत यायची नाही. एक दिवस बीचवर सुखदा आणि अंतराला बघितलं. लेकीला परत आणण्याची इच्छा जागी झाली साहेब. त्यांचा पाठलाग केला. तिथे रंजना आणि कुमुदलाबघून मला आश्चर्याचा धक्का बसला. कुमुद मला अंतराजवळ जाऊ देईना. त्या दोघींच्या आत्म्याला खरं काय ते सांगितल्याशिवाय शांति मिळणार नव्हती. कुमुद सोबत आता रंजना सुखदासाठी धावून आलेली बघून माझं डोकं फिरलं. आता तर हा बळी घ्यायचाच मी ठरवलं. ते निघणार त्या दिवशी मी पहाटेच कारमध्ये गुंगीचं औषध टाकलं. गाव संपताच त्यांना  गरगरायला हवं होतं. त्यांनी कार थांबवायला हवी होती. पण थोडं दूर जाऊन कारला अपघात झाला..." प्रतिमा

"आता सांग कोणत्या मंत्रांनी तू त्यांना वश केलं आहे? मानेवर चिन्ह कशी आणि केव्हा घातली." संकर्षणने ओरडत विचारलं

"मला अंदाज होताच....मी आधीच जवळच लपून बसले होते. गाडी थांबायची वाट बघत होते. पण गाडी झाडावर आदळली. तो चहावाला धावत आला आणि लोकांना बोलवायला गेला. मी तिघांच्या मानेवर चिन्ह काढली पण त्या मण्यांच्या टोपीमुळे मला अंतराला उचलता आलं नाही. ती टोपी म्हणजे सुरक्षा कवच होतं. तेवढ्यात लोकं गोळा झाली आणि मला पळ काढावा लागला. परत वाचली ती... सोडा मला...आता मात्र मी तिला सोडणार नाही"

पोलिसांनी एकच फटका देता...प्रतिमा बडबड करायची थांबली.

कुमुदने सुखदाचा जीव वाचवला होता .....ती होती म्हणून प्रतिमा सुखदा आणि अंतरेला काही करु शकली नाही.

"चल, बऱ्याबोलानं त्यांची वशीकरण मंत्रातून सुटका कर." संकर्षण हात उगारत म्हणाला

"कर पटकन." मधुमंजिरी

"मी करते...मी करते....." प्रतिमा तिच्या जटा संकर्षणच्या हातून सोडवत म्हणाली.

मधुमंजिरीने पूर्वाला फोन लावला.

"हॅलो पूर्वा, सगळयात आधी जयेश, सुखदा आणि अंतराच्या त्या चिन्हांवर मी तुला पाणी शिंपडायला दिलं होतं ते शिंपड. नंतर सविस्तर सांगते." मधुमंजिरी

"ओके. करते." पूर्वा

"सर, प्रतिमा माथेफिरु आहे. तिला कडक शिक्षा व्हायला हवी. तिने परत असं करता कामा नये. आणि हो सर, तिच्याकडून तळकोकणातील त्या सुगानबाबाचा पत्ता घ्या. त्याला शिक्षा व्ह्यायला हवी." संकर्षण

"आकाश, रंजनाच्या रहात्या घरी जायला हवं." संकर्षण

नारुअण्णाने सांगितलेल्या पत्त्यावर ते गेले. अनेक वर्षांपासून बंद त्या घरात सगळीकडे धुळच धुळ होती. घर म्हणजे एक खोली आणि छोटसं स्वयंपाकघर. मोजक्या वस्तु असलेले ते घर, त्या घरात जर्जर झालेल्या कपाटात शाळेचे जुनाट दप्तर सापडलं.

आकाशला नसला झाला तरी मधु आणि संकर्षणला त्या दोघींच्या अस्तित्वाचा भास झाला. तिथे दोघांनी प्रतिमा पोलिसांच्या ताब्यात आहे. सुखदा अंतरा आणि जयेश सुखरुप असल्याचं

सांगितलं. तसं धुळखात टेबलावर अक्षरं उमटली "कुमुद-सुखदा". मधुमंजिरीने त्या टेबलाच ड्रावर उघडला. त्यात सात सागरगोट्या होत्या. मधुने त्या उचलत त्यांना जाण्याची विनंती केली.

"हे सगळं किती विलक्षण आहे." आकाश

"हो ना. अरे, आत्मे नेहमी प्रतिशोधच घेतात असं नाही. सर्वसामान्य नेहमी असाच कयास काढतो. अर्थात त्यांची चुक नाही. असो." मधुमंजिरी

"आपलं काम झालं आहे. आता आपल्याला निघायला हवं." संकर्षण

"माझा तर अजूनही विश्वास बसत नाहीया." आकाश

"मग मधुमंजिरी? कसा होता तुझा हा अनुभव. तुझ्या संशोधनात या घटना तू कशी नमुद करणार......मला वाचायला आवडेल." संकर्षण

"नक्कीच." मधुमंजिरी हसत म्हणाली

"आता कसे आहेत तिघंही?' मधुमंजिरीने दवाखान्यातील जयेशच्या रुममध्ये येत विचारलं

"आऊट ऑफ डेंजर." परेश

"दे वील बी ऑलराईट सुन. डोन्ट वरी." संकर्षण

"काय झालं? डिटेलमध्ये सांगशिल का?" पूर्वा

"हो. अग रत्नाआत्या आणि चिन्मयकाकांना बोलव. सांगते सगळं." मधुमंजिरी

प्रतिमा...तिचं कारस्थान, रंजनाच कमलच्या रुपात येऊन सुखदाला मदत करणं....ती मण्यांची टोपी....त्या टोपीमुळे वाचलेले प्राण ... सविस्तर सांगितलं.

"रत्नाआत्या, दिवेआगरला लग्नात घडलेल्या त्या अपघाताला तुम्ही किंवा सुखदा जवाबदार नाही हे सांगायचं होतं त्या दोघींना. पण तुम्हाला कळलच नाही. त्या दिवशी नेमकं काय घडलं, हे सांगण्यासाठी त्या दोघी तुमची वाट बघत होत्या. तो अपघात सुखदामुळे झाला याच संभ्रमात तुम्ही इतके वर्ष होत्या." मधुमंजिरी

"मण्यांची टोपी आणि या सागरगोट्या...जपून ठेवा. कुमुदने तिच्या मैत्रीणीला दिलेली भेट आहे ती." मधुमंजिरी सागरगोट्या रत्नाआत्यांच्या हातत देत म्हणाली

"या सागरगोट्या दोघी खेळत होत्या. सुखदाने तेव्हा अशाच गोट्यांचा खुप हट्ट केला होता." रत्नाआत्या

"कुमुदनं तिची मैत्री जपली...सुखदा शुद्धीवर आल्यावर तिला सगळं सांगा." संकर्षण

"पूर्वा, तू पहिल्यांदा मला भेटायला आली तेव्हा तुझ्या मनात अनेक प्रश्न आणि शंका होत्या. पॅरानॉर्मल गोष्टींचा शोध घेतांना आमचा ईश्वरीय शक्तींवर विश्वास असतो. त्या विश्वासामुळेच अनाकलनीय असलेली परिस्थिती, त्याचे संदर्भ...त्या संदर्भांचा अर्थ आम्हाला उमगत जातो." मधुमंजिरी हसत म्हणाली.

"या देहाचे अस्तित्व तुला मान्य आहे ना. तसेच आत्मा अस्तित्वात आहे." संकर्षण

**-----------समाप्त----------**

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. विनिता देशपांडे यांचे हे सहावे पुस्तक.**

विनिता देशपांडे यांच्यासारख्या ज्येष्ठ लेखिका आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२१ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (६ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७), डॉ. वृषाली जोशी(१३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।